# मुंबईत मराठी साहित्य भवन उभारणार - उद्धव ठाकरे

**प्रतिनिधी**



पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर यांच्यासारखी दिग्गज मराठी माणसे महाराष्ट्रात होऊन गेली. त्यांनी आपल्या चौफेर आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाने महाराष्ट्रावर व जगात आपला ठसा उमटविला. अशी माणसे पुन्हा होणे नाही. त्यामुळे या दिग्गज माणसांच्या साहित्य, नाटक, संगीत यांचे एक परिपूर्ण मराठी साहित्य भवन आम्ही मुंबईत उभारणार असल्याची घोषणा शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज गोरेगाव येथे बोलताना केली. हे काम तर खरे सरकारचे आहे, त्याला दिल्लीची परवानगी नको. सरकारने हे काम केले नाही तर पालिकेत आमची सत्ता असल्याने जसे शिवाजी पार्कवर संयुक्त महाराष्ट्र दालन उभे केले तसे मराठी साहित्य भवन आम्ही मुंबईत उभे करून दाखवून अशी घोषणा उद्धव ठाकरे यांनी यावेळी केली. प्रबोधन गोरेगाव आयोजित तीन दिवसांच्या पुल उत्सवाच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सुभाष देसाई आणि संस्थेचे अध्यक्ष डॉ. मनोहर अद्वानकर मंचावर उपस्थित होते. पु. ल. देशपांडे यांच्यासंदर्भात शालेय विद्यार्थी आणि खुल्या गटात घेण्यात आलेल्या प्रश्नमंजूषा व निबंध स्पर्धेतील विजेत्यांना उद्धव ठाकरे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. प्रबोधन गोरेगावतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या ‘पुलश्री’ या अंकाचे प्रकाशन तसेच संजय पेठे यांनी तयार केलेले बुक गंगा डॉट कॉम या संकेतस्थळावर टाकण्यात आलेल्या

अंकाचेही

उदघाट्न उद्धव ठाकरे यांनी यावेळी केले. पु. ल. देशपांडे यांच्याविषयी बोलताना ते म्हणाले की, पुलंनी कोणताही विषय सोडला नाही. मराठी माणसाची कमतरता आपल्या लेखणीतून त्यांनी दाखवून दिली. महोत्सवाचे आयोजन केल्याबद्दल तसेच संकेतस्थळावर पुलंचे यथोचित दर्शन घडविल्याबद्दल सुभाष देसाई

यांचेही त्यांनी कौतुक केले. यावेळी मुलाखतकार सुधीर गाडगीळ यांनी शिवसेनाप्रमुखांच्या पुलंविषयीच्या आठवणी जागविणारी चित्रफित दाखविण्यात आली.

या कार्यक्रमानंतर प्रसाद महडकर यांच्या जीवनगाणी निर्मित ‘संगीत आ‘पुल’की’ हा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्याशिवाय मंगेश पाडगावकर यांनी लिहिलेली व जितेंद्र अभिषेकी यांनी स्वरबद्ध केलेली दोन गाणी शौनक अभिषेकी यांनी सादर केली. रसिकांच्या प्रचंड प्रतिसाद तीन दिवस रंगलेल्या पुल उत्सवाचा समारोप दणक्यात झाला.